# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## अपिल क्र.मुमाआ/नों.क्र.९३३/२०२३/४४१९/२०२६

श्री.भरत शिवाजी पगारे
युनिट नं.२५, माथाई पाडा,
पिकनिक पॉईट जवळ, आरे मिल्क,
कॉलनी, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६५.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कार्यकारी अधिकारी,
आरे दुग्ध वसाहत,मुख्य कार्यकारी अधिकारी,आरे,मुबंई-४०००६५.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी,
आरे दुग्ध वसाहत,मुख्य कार्यकारी अधिकारी,आरे,मुबंई-४०००६५.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१२.२०२१ | -- | २१.०१.२०२२ | -- |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक २०/१२/२०२१ रोजीच्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी आरे दुग्ध वसाहत यांच्याकडे **खालील प्रमाणे जोडपत्र सादर केले आहे :-**

I have all Document, Affidavit Dt: 24.07.1992, Photo pass Copy, Eligible attachments Copy, Payment Receipt, Application Register No.0506669, Collector Letter, Election Certificate from 1993, Ration Card, Aadhar & Pan Card. I am given application to Adani Electricity for Meter Connection they asking CEO, NO OBJECTION CERTIFICATE.

प्रस्तुत जोडपत्रानुसार अपिलार्थीना वीज जोडणी करिता संबंधित प्राधिकरणाने ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) अपेक्षित असल्याचे आढळून येते. यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कुठलीही कार्यवाही केली नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक २१/०१/२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला व त्यानंतर दिनांक २०/०६/२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

प्रथम अपिल अर्जावर दिनांक २२/०३/२०२२ रोजी सुनावणी झाली तथापि, यात पारित केलेला निर्णय योग्य नसल्याचे तसेच त्याची साक्षांकित प्रत मिळालीच नसल्याचे अपिलार्थीनी नमूद केलेले आहे.

अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार ते राहत असलेल्या आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व) येथील आजूबाजूच्या अनेक घरांना अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनी द्वारा वीज मीटर देण्यात आले. तथापि, त्यांना यातून जाणून-बुजून वगळण्यात आलेले आहे, याबाबतीतील कारणमिमांसा त्यांना अपेक्षित असल्याचे आज झालेल्या सुनावणीत आढळून येते.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांचा एका संचाशी विद्यमान अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी वसाहत, मुंबई-६५ यांनी प्रशासकीय पातळीवर पडताळणी करून, नैसर्गिक न्याय तत्वाचा अवलंब करून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल क्र.४४१९/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**
**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०१-०६-२०२६**

Jyotsna